जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2017
पुढारी

# विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन बाळगावा : डॉ. डी. आर. मोरे

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** आजच्या तरुणाईला शिक्षणाच्या चांगल्या संधी मिळत आहेत. पण दर्जा सुधारण्याबाबत अजूनही प्रयत्न होण्याची गरज असून तरुणांनी केवळ पदवी घेऊन न बसता शेवटच्या क्षणापर्यंत सकारात्मक राहण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी केले. कोल्हापूर वुई केअर-कॅम्पेशन २४ युथ अनेक्स आणि जुगाड काऊन्सिलिंग सेंटर यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. डॉ. मोरे आणि गृह पोलिस अधिक्षक सतीश माने यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. डॉ. मोरे म्हणाले, व्यक्तिमत्व विकासासाठी इंग्रजी भाषेला आत्मसात करणे काळाची गरज आहे. गेल्या ७० वर्षांच्या काळात देशातील शैक्षणिक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. वुई केअरचे अध्यक्ष मिलिंद धोंड यांनी वुई केअरच्या उपक्रमांचा आढावा घेऊन कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. यावेळी मिसेस महाराष्ट्र गौरी शिरोडकर, युथ अनेक्सच्या कोल्हापूर विभागाच्या अध्यक्षा तेजस्विनी गायकवाड, रौनक शहा, सुशील गांधी, पुजा पवार, सुजित काशिद, मंजिरी कापडेकर, स्नेहा कब्बूर, कविता घाटगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 JAN 2017
पुण्यनगरी

### शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मतदार जागृतीपर पथनाटय सादर केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, पी. टी. गायकवाड, डॉ. नमिता खोत यांच्यासह आदी उपस्थित होते.

28 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# मतदानाची सुट्टी म्हणजे 'एन्जॉय' नव्हे

## विश्वास नांगरे-पाटील यांचे प्रतिपादन; राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मतदानाची सुट्टी ही 'एन्जॉय' करण्यासाठी नसून ती राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी आहे, याची जाण ठेवून प्रत्येकाने मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, असे आवाहन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांनी केले.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त बुधवारी शाहू स्मारक भवनमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी होते. यावेळी मतदानाचा हक्क बजावण्याची शपथ घेण्यात आली.

मतदानाचा हक्क बाजवणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्यच आहे, असे सांगत विश्वास नांगरे-पाटील म्हणाले, निवडणुकामध्ये मतदारांनी मुक्त, निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावावा. कोणत्याही प्रलोभनाला, आमिषाला बळी पडू नये,' असे आवाहनही त्यांनी केले.

**मतदार नोंदणीची प्रक्रिया निरंतर : डॉ. सैनी**

'सक्षम करू या युवा व भावी मतदार' हे घोषवाक्य घेऊन संपूर्ण देशभर मतदार जागृती अभियान गतिमान केले असून मतदार नोंदणीची निरंतर प्रक्रिया सुरू आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. सैनी यांनी सांगितले. मतदारांसाठी निवडणूक आयोगाने 'सीओपी' हे ॲप्लिकेशन आणले असून त्याचा आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमध्ये वापर केला जाणार आहे. याबरोबरच 'टु व्होटर ॲप्लिकेशन' आणले असून त्यामुळे मतदारांचे नाव, मतदान केंद्र आदी माहिती मतदारांना घरबसल्या उपलब्ध होणार आहे. या सुविधेचा जिल्ह्यातील मतदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी रवींद्र खाडे यांनी स्वागत केले. प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आभार मानले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, पोलिस अधीक्षक महादेव तांबडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर, विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदिवडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, ज्ञानेश्वर ढेरे, उत्तम दिघे, चंद्रकांत वाघमारे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील. यावेळी डॉ. अमित सैनी, डॉ. कुणाल खेमनार, महादेव तांबडे, नंदकुमार काटकर, विलास नांदिवडेकर, संजय शिंदे, ज्ञानेश्वर ढेरे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2017
तरुण भारत

# परराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर मुळे यांना डी. लिट्

**इचलकरंजी :** भारत सरकारच्या विदेश मंत्रालयाचे संदेश सचिव ज्ञानेश्वर मुळे यांना डी.वाय. पाटील



विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लिटरेचर (डी. लिट) ही मानाची पदवी पुणे येथे सोमवारी झालेल्या विद्यापिठाच्या ११ व्या पदवीदान समारंभात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री फागनसिंग कालुस्ते यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले. ज्ञानेश्वर मुळे हे मुळचे शिरोळ तालुक्यातील अब्दुललाट गावचे सुपुत्र असून त्यांनी भारतीय उच्च आयोगामध्ये जपान, रशिया, मालदीव, सिरीया व अमेरिका आदी देशात भारतीय राजदूत म्हणूत कार्यभार सांभाळला आहे. त्यांनी काम केलेल्या प्रत्येक देशातील राजकारण, तेथील प्रेरणा, संस्कृती याविषयी मराठीमध्ये माहितीपर पुस्तके लिहिली आहेत. मुळे हे शिवाजी विद्यापिठाचे पदवीधर असून भारतीय परदेश सेवेमध्ये त्यांनी ३५ वर्षे नोकरी केली आहे. एक सक्षम अधिकारी म्हणून ते देशाला परिचित आहेत. त्यांनी आजवर केलेल्या कार्यांचा व स्वयंशिस्तींचा आढावा घेवून डी वाय पाटील विद्यापिठाने ही पदवी बहाल करुन त्यांचा गौरव केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 JAN 2017
तरुण भारत

# भूगोल अधिविभागात सोमवारी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागामध्ये सोमवारी ३० रोजी 'भारतातील भौगोलिक संशोधनातील प्रगती' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रास यु. जी. सी. सपचे आर्थिक सहकार्य लाभले आहे. हे चर्चासत्र भूगोल विभागामध्ये होणार असून भारतातून भूगोल विषयातील एकूण १०० संशोधक व शिक्षक सहभागी होणार आहेत. प्रा. सचिन देवरे, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, पुणे मार्गदर्शन करणार आहेत. होणार आहे. तरी या चर्चासत्रामध्ये इच्छूकांनी भूगोल विभागामध्ये संपर्क साधावा किंवा शिवाजी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन प्रभारी विभागप्रमुख डॉ. पी. एन. भोसले यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 JAN 2017
लोकमत

# विद्यापीठात सोमवारपासून राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागामध्ये सोमवार (दि. ३०) पासून 'भारतातील भौगोलिक संशोधनातील प्रगती' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याचे उद्‌घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते होणार असून प्रा. सचिन देवरे, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, पुणे यांचे बीजभाषण होणार आहे. या चर्चासत्रात भारतातून शंभर भूगोल विषयातील संशोधक व शिक्षक सहभागी होणार आहेत.

चर्चासत्रामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी भूगोल विभागामध्ये किंवा शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन प्रभारी विभागप्रमुख डॉ. पी. एन. भोसले यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 JAN 2017
तरुण भारत

# सी.ई.टी. कार्यशाळेचे शिवाजी विद्यापीठात आयोजन

**कोल्हापूर :** राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे 'व्यवस्थापन शास्त्र' कोर्ससाठी घेतली जाणारी प्रवेश प्रक्रिया ४ व ५ मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे. एम.बी.ए प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए अधिविभागामध्ये २ फेब्रुवारी रोजी एम.बी.ए सी.ई.टी. कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये सी.ई.टी.बाबतचा अभ्यासक्रम, तसेच एम.बी.ए.च्या प्रवेशप्रक्रियेमधील सविस्तर माहिती दिली जाणार आहे. यावेळी मान्यवर व्याख्यात्यांमार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाईल. नोंदणी नि:शुल्क आहे. तरी या कार्यशाळेचा लाभ जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन एम.बी.ए. अधिविभागाचे संचालक डॉ. एच.एम. ठक्कर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JAN 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठातील एमबीए अधिविभागामध्ये कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

तंत्राशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे व्यवस्थापनशास्त्र या कोर्ससाठी घेतली जाणारी प्रवेश प्रक्रिया ही ४ व ५ मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे. एमबीए प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागातर्फे २ फेब्रुवारी रोजी डॉ. रामानुजन सभागृह, गणित अधिविभागामध्ये एमबीए सीईटी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना एमबीएच्या सीईटीबाबतचा अभ्यासक्रम तसेच एमबीएच्या प्रवेश प्रक्रियेमधील सविस्तर माहिती दिली जाणार आहे. एमबीए सीईटी कार्यशाळेसाठी मान्यवर व्याख्यात्यांमार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. एमबीए सीईटी कार्यशाळा निःशुल्क असणार आहे. या कार्यशाळेचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन एमबीए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.